गंगाजल

# CERTIFICATE OF APPRECIATION AWARDED

*To*

## *Mr. Vinit Waghe*

*For prize winning in '2nd National Photography, Documentary & Essay Thematic Competition 2008' Occasion of 'World River Year 2008'*

*Held In Mumbai*

*For Essay*

**BEST ESSAY**

*-: Organized By-:*

**Gangajal Nature Foundation,** *Mumbai*


(Registration No - E 24431, Mumbai)

*96/2715, 'Shree' CHS, Kannamwar Nagar-2, Vikhroli (East), Mumbai-400 083*

*Phone-022 25775070*

*Website- http://www.gangajal.org.in/*

*E-mail – admin@gangajal.org.in*


गंगाजल नेचर फाउंडेशन मुंबई

(VIJAY MUDSHINGIKAR) PRESIDENT

(ROHAN MUDSHINGIKAR) PROGRAM COORDINATOR

(SURENDRA MISHRA) MANAGING TRUSTEE

गंगाजल नेचर फाउंडेशनचे

# गंगाजल



पर्यावरण वार्षिक विशेषांक २००९

स्वागत मूल्य ५० रुपये

## अनुक्रमाणिका


- गंगाजल छायाचित्र प्रदर्शन ते गंगाजल नेचर फाउंडेशन! / विवेक बुवा / ४
- राम तेरी गंगा–यमुना मैली / कुमार केतकर / ९
- सुंदरलाल बहुगुणा / साभार लोकसत्ता / ११
- महापूर दांभिकतेचा / अतुल देऊळगावकर / १२
- मुंबईच्या नावानं गोंधळ मांडला! / नरेंद्र प्रभू / १७
- पंचगंगा नदी – प्रश्न प्रदुषणाचा! / उदय गायकवाड / २२
- गंगेच्या नावानं चांगभलं! / विजय मुडशिंगीकर / २५
- स्थलांतरीत पक्ष्यांचे आश्रयस्थान – मुंबईतील..... / संगीता खरात / २९
- भगीरथ तेरी गंगा मैली / सुरेशचंद्र वारघडे / ३२
- नागपूरची नाग नदी (उत्कृष्ट निबंध) / विनीत वाघे / ३६
- मरणासन्न नद्या / अभिजीत घोरपडे / ३८
- बांधकामातील पाणी! / संतोष देवधर / ४३
- कोसी की तकदीर लिखने से पहेले / सझिया समांग / ४६
- 'जल ही जीवन है' / ४८
- Solid Waste Management in Kanpur / G.K.Tandon / ४९
- Save Water Always! / ५२


# नागपूरची नाग नदी

(निबंध स्पर्धेतील उत्कृष्ट निबंध)

❖ विनीत वाघे

प्राचीन काळी जेव्हा कधी माणसाने एकाच जागी स्थिर वास्तव्यास सुरुवात केली असेल तेव्हा सर्वात आधी जर कसला शोध घेतला असेल तर तो पाण्याचा; किंबहुना पाण्याचा आणि इतर नैसर्गिक गोष्टींच्या मुबलकतेनेच या भटक्या प्राण्याला स्थिरस्थावर होण्यास प्रेरणा दिली असेल. यातूनच मग पाण्याचे अक्षय स्त्रोत अशा नद्यांच्या काठाने वसाहती वसु लागल्या. कित्येक शतकं अविरत या स्त्रोतांचा थेट वापर आणि त्यांच्या जपणुकीसाठी लोकांनीच घालून घेतलेले काही नियम यांच्या सहाय्याने ही शहरे नगरं भरभराटीला आली. पण पुढे कधी तरी तंत्रज्ञानाने वेग घेतला. मानवी श्रम यंत्राकडे सोपवले गेले. पाणी नळाने घरोघरी येऊ लागलं. ते पोहोचवण्याचं काम घरातून सरकारकडे गेलं. त्यासाठी प्रचंड धरणं, शुद्धिकरण यंत्रणा उभारल्या जाऊ लागल्या. आणि याबरोबरच पाण्याच्या थेट स्त्रोतांचं महत्व मात्र घटत चाललं. विहिरी बुजवल्या जाऊ लागल्या तर नद्या बनल्या निव्वळ सांडपाणी वाहून नेणारे नाले.

अशीच काहीशी कहाणी आहे नागपुरच्या नाग नदीची. नागपुर शहराच्या पश्चिमेकडल्या अंबाझरीवरच्या टेकड्यांमध्ये हिचा उगम. एकदा डोंगरांमधून खाली आल्यावर पुढचा हिचा प्रवास पूर्ण सपाटीवरूनच. उत्तरेच्या गोरेवाडा टेकड्यांतून येणारी पिवळी नदी हिला नागपूरच्या पूर्व सिमेवर येऊन मिलते तर दक्षिणेकडून वाहाणारी पोरा नदी आणखी थोडं पुढे जाऊन हिची भेट घेते. नावातूनच नागपुर शहराशी जोडलेली नाळ आणि काठावर वसलेली प्राचीन मंदिरं नाग नदीच्या ऐतिहासिक महत्वाची साक्ष देतात. म्हणूनच या नदीचं महत्व ओळखून नागपुर महापालिकेने हिचं पावित्र्य आणि सौंदर्य पुनर्स्थापित करण्याचं ठरविलं. मग या दृष्टिने अभ्यास करून उपाययोजना सुचविण्यासाठी ग्रासरुट्स रिसर्च आणि कन्सल्टन्सिची नेमणुक करण्यात आली. यात उपग्रह छायाचित्र, जी.आय.एस. प्रणाली, उपलब्ध नकाशे, प्रत्यक्ष सर्वेक्षण यांचा अधार घेत नदीचा भौगोलिक, पर्यावरणविषयक, सामाजिक तसेच किनाऱ्यांवर होऊ घातलेल्या विकासाचा अभ्यास हाती घेतला गेला. ग्रासरुट्सच्या गेल्या काही महिन्यांच्या या कामामधून समोर आलेल्या गोष्टी थोडक्यात सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा हा प्रयत्न.



अभ्यासाला सुरुवात झाली ती परिसराचा निसर्ग आणि भुगोल समजून घेण्यापासून. नागपुरचा परिसर चोहोबाजूंनी अभयारण्यांनी म्हणजेच तुलनेने चांगल्या स्थितीत असलेल्या परिसंस्थांनी घेरलेला. पश्चिमेला बोर, मेळघाट उत्तरेला पेंच, बोरी पुर्वेला नागझिरा, नवेगाव तर दक्षिणेला ताडोबा, किनवट. या सर्वांमधून वाहणाऱ्या कन्हान नदीची नाग ही उपनदी. नद्यांच्या ह्या विस्तृत खोऱ्याचा तार पाहिला तर पश्चिम आणि उत्तरेकडून आग्नेयेकडे. अर्थात नद्यांची ही खोली म्हणजे संरक्षित वनांमधल्या जीव-जंतुंसाठी आणि वनस्पतींसाठीही स्थलांतराचे, देवघेवीचे मार्ग आणि या मार्गावरच वेगाने पसरत जाणाऱ्या ह्या महानगराने केलेला कुठाराघात. शहराच्या पश्चिमेकडील टेकड्यांवर मात्र अजूनही थोडी झाडी शिल्लक आहे. याच भागात काही संस्थांच्या आवारातही चांगली हिरवाई जपलेली आहे. मग विचार पुढे आला की नकाशावरच्या या छोट्या छोट्या हिरव्या आकारांना स्थानिक वृक्ष संवर्धन, लागवड सारखे मार्गदर्शक नियम करता येतील. जोडीला नद्यांच्या काठाने आणकी काही हिरवे पट्टे निर्माण करून हे नैसर्गिक मार्ग जतन करता येतील.

पुढे आणखी जवळ जाऊन नदीची सद्यस्थिती सांगायची तर आधीच

म्हटल्याप्रमाणे काळकुट्ट सांडपाणी वाहुन नेणारा एक मोठ्ठा नाला. दाट लोकवस्तीतुन भिंती बांधुन सरळ करून घेतलेला. कुठे संस्थांच्या आवारातुन कुठे रस्त्याच्या काठाने आपली सोबत करतो, कुठे इमारतींच्या मागुन जात झोपडपट्ट्यांच्या दिसेनासा होतो. काठावर, अधेमधे साठलेला घनकचरा; तरंगमाऱ्या प्लॅस्टिकच्या पिशव्या आपल्या बेशिस्तपणाची कीव करत असतात. नागपुर शहरातल्या सोळा किलोमीटरच्या नाग नदीच्या प्रवासात हेच दृश्य थोडाफार आलटुन पालटुन. म्हणुन सगळ्यांनाच नकोसं झालेलं. सोळा कि.मी. ची ही पुर्ण लांबी पुनर्जिवीत करणं अनेक दृष्टिने अशक्य असल्याचं प्राथमिक अभ्यासातच लक्षात आलं. मग नदीच्या काठावरची पर्यावरण, इतिहास, सामाजिक इ. दृष्टिने संवेदनशील आणि महत्वाची स्थानं सखोल अभ्यासासाठी निवडली गेली.

नदीच्या उगमापासून सुरवात करायची तर तिथे आता अंबाझरीचं धरण उभं आहे. नागपुरच्या पाणी पुरवठ्यासाठी १८७० साली बांधलेलं हे धरण कारखान्यामुळे पाणी प्रदुषित झाल्यावर पिण्यासाठी याचा वापर बंद झाला. सध्या नाग नदीचा उगम म्हणायचा तर या धरणाच्या ओव्हरफलो पासुन. वॉटर पार्क, इमारती, स्मशान अशा सगळ्यांना स्पर्श करत नाग नदी आपल्याला पहिल्यांदा व्यवस्थित दृष्टिस पडते ती कॅनल रोड च्या अंगाने. काळ्या पाणाच्या या कॅनलला दृष्टिआड करीत रस्त्याने लोकांची वर्दळ चालु असते. हमरस्ताही नाही आणि गल्ली ही नाही, मोठ्या वृक्षांनी छान सावली धरलेली, एका बाजुला व्यवस्थित इमारतींची रांग तर नदीच्या पलीकडे शैक्षणिक संस्थेचं हिरव कॅम्पस. अशा ह्या ठिकाणी पहिल्यांदी नदीला लोकाभिमुख करण्याची किंवा लोकांना तिच्या जवळ आणण्याची संधी आम्हाला मिळाली. सर्वप्रथम नदीत येणारे गटरांचे पाणी स्वच्छ करण्यासाठी छोटा एस.टी.पी त्यानंतर फुटपाथवरून लोकांना नदीजवळ नेण्यासाठी घाट, दोन्ही काठांवर झुडुपांची, फुलझाडांच्या लागवडीची व्यवस्था अशी योजना बनत गेली. नदीच्या पात्राता छोटे बांघ जे जमिनीत पाणी मुरण्याला तसेच हवेतील आर्द्रता वाढविण्याला पोषक ठरतील. नागपुर सारख्या कोरड्या शहराला जेथे तापमान ४८ चा आकडा पार करते अशा आर्द्रतेची नितांत आवश्यकता आहे. महाराजबाग किंवा काही संस्थांच्या आवारात जेथे पात्र अजुनही नेसर्गिक स्थितीत आहे तेथे बादांवर काथ्यासारख्या नैसर्गिक साधनांच्या वापर करून पाण्याचं शुद्धिकरण करता येईल. काही ठिकाणी जलवनस्पतींचाही वापर यासाठी करता येईल.

या पुढचं आणकी एका महत्वाचं ठिकाण म्हणजे फुटाळा नाला आणि नदीचा संगम. हा संगम सध्या वस्तीमध्ये पुर्ण दृष्डिआड झालेला, कचरा अन मैल्याने व्यापलेला, इथपर्यंत पोहोचणंही मुष्किल. पण संगमाच्या त्रिकोणावर बांधलेलं पुरातन शिवालय आणि दगडी घाट स्थानाचं पावित्र्य अजुनही राकुन आहेत. कोरिवकामही उत्कृष्ट. लगेचच ध्यानात आलं की नदीला नदी म्हणुन लोकांच्या मनात स्थान मिळवुन द्याचं तर या संगमाचं पावित्र्य टिकवण अत्यावश्यक आहे. त्या दृष्टिने योजना आखली गेली. नियोजनात घाटांची डागडुजी, मंदिरापर्यंत जाण्यासाठी चांगल्या मार्गिका, नदी पार करण्यासाठी छोटे पुल, शौचालय, निर्माल्य व्यवस्थापन, उद्यान आदी गोष्टी घेण्यात आल्या. नदीत सांस्कृतिक, ऐतिहासिक महत्व अधोरेखित करण्याची ही आयतीच संधी होती.

नदीची नैसर्गिक परिसंस्था पुनर्जिवित करण्यासाठी व लोकांना अधिक निसर्गाजवळ आणण्यासाठी नदीच्या पुर्वेकडील भागात अधीक संधी आहे. या भागात नदीचे काठ अजुनही काही प्रमाणात मोकळे आहेत. एकदा का काठापर्यंत घरं आली की पुढे अती पावसात पुर येऊन नुकसान येण्याची समस्याही वाढतात. नागपुराच्या काही भागात ही समस्या आहे. शिवाय चांगल्या प्रसन्न वातावरणामुळे एकूण सामाजिक स्वास्थही ताजंतवान रहातं. यासाठी मोकळे असलेले हे काठ संरक्षित करम्याची महापालिकेला अजुनही संधी आहे. काठांना स्थानिक वृक्षप्रजातींची लागवड करून संरक्षित पट्टे तयार करता येतील. नागरिकांना जॉगिंग, सायकलींग साठी या भागाचा वापर करून स्वास्थलाभ मिळवता येईल. पर्यावरण-पक्षी प्रेमिनांही हे पट्टे आकर्षुन घेतील.

कित्येक ठिकाणी नदी शैक्षणिक संस्थांना खेटुन जाते. एकदा नदीत येणारं पाणी स्वच्छ करण्याची योजना अमलात आली की काठावरच्या जमिनीचा वापर करून पर्यावरण, शेती आदी विषयांची प्रात्यक्षिकं घेता येऊ शकतील.

एवढ्या निबंधाता साऱ्या योजना व त्यासाठी केला गेलेला तांत्रीक अभ्यास मांडणे अशक्य आहे. थोडक्यात सांगायचं तर एक व्यापक पर्यावरणीय आणि सामाजिक दृष्टिकोन हा अभ्यास करताना सतत होता. त्यातुनच आपल्या सभोवतालच्या निसर्गाची उपेक्षा आणि सुट्टीच्या दिवशी मात्र दुर कुठेतरी मोकळ्या हवेत जाण्याची हौस ही जाणीव पुसून निसर्गाला शहरातही आपला रोजचा सोबती करण्याचा हा प्रयत्न. प्रयत्न कितीही अल्प असला तरी एकदा का ही नदी जवळची वाटू लागली की आपल्याही जाणीवा वाढू लागतील. मग लोकसहभागातुनच उत्स्फुर्तपणे निसर्गाशी तुटलेली नाळ जुळु लागेल आणि नद्यांना मातृस्थानी मानणाऱ्या आपल्या प्राचीन संस्कृतीचं पुन्हा एकदा पुनरूज्जीवन होईल.

---

– विनीत वाघे
ग्रासरूट्स रिसर्च आणि कन्सल्टन्सी
www.grassrootsresearch.org
vinit.v@gmail.com

(निबंध स्पर्धेसाठी आलेल्या इतर निबंधांना 'गंगाजल'च्या ब्लॉगवर प्रसिद्धी देण्यात येईल.)